Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 400 020 ● Tel: 22022050

२४ जानेवारी २००८

# गहू घोटाळा : ६८२ पैकी २८५ नमुने खराब असल्याचे सरकारला मान्य – डॉ. किरीट सोमैया

सरकारच्या आरोग्य विभागाच्या उपसंचालकांनी डॉ. किरीट सोमैय्या यांना पाठविलेले ताजे परिपत्रक अतिशय धक्का देणारे आहे. उपसंचालकांनी २३जानेवारी २००८ रोजी डॉ. किरीट सोमैय्या यांना पाठविलेल्या पत्रात आयात केलेल्या लाल गव्हाच्या राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या एकूण ६८२ नमुन्यांपैकी २८५ नमुन्यांमध्ये भेसळ असल्याचे तसेच मानवी आरोग्याला घातक असल्याचे नमूद केले आहे. याचा अर्थ राज्य सरकारच्या गोदामांमध्ये भरून ठेवण्यात आलेल्या तसेच वितरित करण्यात आलेल्या आयातीत लाल गव्हापैकी सुमारे ४२ टक्के गहू भेसळयुक्त आणि मानवी आरोग्याला धोकादायक आहे.

हा आयातीत लाल गहू वितरणातून ताबडतोब काढून घ्यावा, अशी मागणी डॉ. किरीट सोमैय्या यांनी पुन्हा एकदा केली आहे. तसेच आयात करण्यात आलेला या लाल गव्हात भेसळ कशी काय झाली, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीने राज्याचे नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनील तटकरे आणि केंद्रीय कृषी व सार्वजनिक वितरणमंत्री शरद पवार यांच्याकडे केली आहे.

आरोग्य उपसंचालकांनी डॉ. किरीट सोमैय्या यांना कळविले आहे की, – निरीक्षण केलेल्या एकूण ६८२ नमुन्यांपैकी २८५ नमुन्यांमध्ये भेसळ करण्यात आल्याचे तसेच हा गहू पीएफए नियम – १९५५ नुसार मानवी आरोग्यासाठी धोकादायक आहे. भेसळयुक्त बव्हंशी नमुने किड्यांमुळे खराब झाले आहेत अथवा कीड लागलेले आहेत. तसेच जिवंत अथवा मेलेल्या किड्यांमुळे गव्हातील युरीक अॅसिडचे प्रमाणही वाढल्याचे आढळून आले आहे. या नमुन्यांच्या तपासणीचा अहवाल संबंधित अधिकाऱ्यांकडे लवकरच पाठविण्यात येत आहे.
पीएफए नियम – १९५५ नुसार गव्हातील युरीक अॅसिडचे प्रमाण जास्तीत जास्त १० टक्के (मोजून) अथवा १०० मिग्रॅ /एक किलोग्रॅम या पेक्षा जास्ती असू नये.

प्रसिद्धी सचिव